वाचा :- १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्राथ-९/६३६/२०१५ दिनांक ७/७/२०१५

२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक यांचेकडील ज्ञापन शिक्षण/प्रा-९/१०७२/१५ दि.५/११/२०१५

३) गटशिक्षण अधिकारी पं.स.निफाड यांचेकडील पत्र क्र पसनि/शिक्षण/आ-३/३९१/१५ दि.२०/११/२०१५

४) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/७०/२०१५ नाशिक दि.२३/२/२०१६

५) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/ख्राचौ/सीआर ७०/१६ दि.२४/११/२०१६

६) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :-

---

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
जा.क्र.शिक्षण/प्राथ-९/६०४/२०१७
नाशिक दिनांक:१६/८/२०१७

आदेश

ज्याअर्थी श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा आहेरगाव ता.निफाड येथे कार्यरत असतांना शाळेत विद्यार्थ्यांसमोर हाणामारी करणे, मुख्याध्यापक यांच्या अंगावर धावून जाणे, अर्वाच्य भाषा वापरणे, शाळेतील संगीत कॅसीओची तोडफोड करणे,इ.बाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती निफाड यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक पसनि/आ-३ -क/ १२९/१५ निफाड दिनांक १५/६/२०१५ नूसार सादर केलेल्या अहवालावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चे भंग केल्याने त्यांना संदर्भ क्रमांक १ चे आदेश क्रमांक .शिक्षण/प्राथ-९ /६३६/२०१५ दिनांक ७/७/२०१५ अन्वये निलंबीत करुन संदर्भ क्रमांक २ चे आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/१०७२/२०१५ दि.५/११/२०१५ नुसार ज्ञापन देऊन खुलासा मागविण्यात आला होता.

ज्याअर्थी श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक यांनी सदर ज्ञापनास दिलेला खुलासा समाधानकारक नसल्याने त्यांचेविरुध्द् महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे कलम ६ (३) तरतुदीनुसार सख्रोल चौकशी करणे कामी या कार्यालयाचे आदेश क्रमांक शिक्षण/प्राथ-९/७०/२०१६ नाशिक दि.२३/२/२०१६ नुसार सहाय्यक आयुक्त (चौकशी) विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली होती.

ज्याअर्थी चौकशी अधिकारी यांनी प्रकरणी सख्रोल चौकशी करता श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक यांचेवर ठेवण्यात आलेले दोन आरोप सिध्द होत नसलेबाबतचा अहवाल त्यांचेकडील पत्र क्र.विशा-४/ख्राचौ/सीआर ७०/२०१६ दि.३०/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे.

ज्याअर्थी उक्त चौकशी अहवालावरुन श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक यांचेवर ख्राते चौकशी दोषारोप परिशिष्ट १ ते ४ मध्ये ठेवण्यात आलेले दोन्ही आरोप सिध्द होत नाही असा अहवाल सादर केलेला असल्याने अहवालाशी सहमत होणे संयुक्तीक नाही. शालेय विद्यार्थ्यांसमोर सहकारी शिक्षकांशी मारामारी करणे, मुख्याध्यापक यांचेवर धावुन जाणे, अर्वाच्य भाषा वापरणे, शाळेतील संगीत कॅसीओची तोडफोड करणे हे शिक्षकी पेशाला न शोभणारे वर्तन आहे. याव्दारे श्री.पाटील यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द् होत आहे.

त्याअर्थी श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक, यांना त्यांचे विरुध्द ख्राते चौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधीकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारा अन्वये श्री.घनश्याम बाबुराव पाटील प्राथमिक शिक्षक यांना ताकीद देणेत येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक यांचे मुळ सेवापुस्तकांत घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति,

श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक.जि.प.शाळा आहेरगाव ता.निफाड हल्ली कार्यरत जि.प.शाळा तोंबवाडी ता.नांदगाव

व्दारा : गटशिक्षण अधिकारी पंचायत समित्ती निफाड/नांदगाव

प्रत:- गटशिक्षणअधिकारी पंचायत समिती निफाड/नांदगाव.

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.घनश्याम बाबुराव पाटील, प्राथमिक शिक्षक यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

प्रत:- प्राथमिक -९ शिक्षण विभाग जि.प.नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक